


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ०७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२२ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बुलडाणा :** हॉकीचे जादुगर स्व.मेजर ध्यानचंद यांच्या जन्म दिवसानिमित्त संपुर्ण भारतात २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधुन खेळाडूंचा सत्कार,खेळाचे प्रात्यक्षिक, विविध क्रीडा स्पर्ध व कार्यक्रमाचे आयोजन दि. २९ ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत होणार आहे.

महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणामार्फत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार, फुटबॉल, हँडबॉल प्रात्यक्षिक सामना, लाठी व काठी प्रात्यक्षिक, जिल्हा स्तरीय वुशू स्पर्धा व विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयात साजरा करण्यात येणार आहे. तसेच मेजर ध्यानचंद यांचे प्रतिमा पुजन, त्यांच्या जीवनावर व्याख्यान, मान्यवरांचे खेळाडूंना मार्गदर्शन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन होणार आहे.

सदर कार्यक्रमामध्ये सन १ ऑगस्ट २०२४ ते ३० जुलै २०२५ मध्ये शालेय व अधिकृत एकविध खेळ संघटनेव्दारा आयोजित अधिकृत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये प्राविण्य तथा सहभाग घेतलेल्या खेळाडूंनी आपल्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथे दि.२५ ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत. जेणेकरुन राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे वतीने प्रमाणपत्र व मेडल देवुन सत्कार करण्यात येईल. तरी दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता गुरुकुल इंग्लिशCBSC) स्कूल , धाड रोड, बुलढाणा येथे उपस्थित राहावे. नमूद केलेल्या तारखेच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य तथा सहभाग घेतलेल्या खेळाडूंनी प्रमाणपत्र कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करावेत. अंतिम तारखे नंतर कोणत्याही खेळाडूंचे प्रमाणपत्र स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी, जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी कळविले आहे.

## गणेशोत्सवाआधी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून भाविकांना मोठं गिफ्ट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गणेशोत्सवासाठी कोकणात गावी जाणाऱ्या प्रवाशांना मोठं गिफ्ट दिलं आहे. कोकणात गणेशोत्सवाला गावी जाणाऱ्या प्रवाशांना टोल आकारला जाणार नाही. एकनाथ शिंदे यांनी कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी टोल माफीची घोषणा केली आहे. यामुळे गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. एकनाथ शिंदे यांनी घोषणा केल्यानंतर कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या काळात टोल माफी असणार आहेत.

येत्या २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या



वाहनांना आणि एसटी बसेसना टोलमाफी मिळणार आहे.

**टोलमाफी कशी मिळेल?**

यासाठी गणेशोत्सव २०२५ – कोकण दर्शन या नावाचे विशेष टोलमाफी पास देण्यात येणार असून त्यावर वाहन क्रमांक आणि वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल. हे पास संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस आणि वाहतूकविभागाकडे उपलब्ध असतील. परतीच्या प्रवासासाठी देखील हेच पास ग्राह्य धरले जाणार आहेत.

शासनाच्या आदेशानुसार ग्रामीण आणि शहरी पोलीस तसेच प्रादेशिक परिवहन विभागाने पास वाटपाचे समन्वय साधून प्रवाशांना वेळेत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच या संदर्भात जाहीरात आणि सूचना प्रसिद्ध करून जनतेला माहिती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. राज्यभरात गणेशोत्सवाआधी लगबग राज्यभरात गणेशोत्सावाआधीची लगबग बघायला मिळत आहे. अनेक मोठ्या शहारांमध्ये बाजारपेठांमध्ये गर्दी बघायला मिळत आहे. गणरायाच्या आगमनाआधी घराघरांत साफसफाई केली जात आहे. गणपती बाप्पासाठी मकर सजवली जात आहेत. मोठमोठ्या मंडळांकडून तयारी केली जात आहे. तसेच घराघरांत गणेशोत्सावाआधीची खरेदी केली जात आहे. गणेशोत्सव हा सण अनेकांच्या जिव्हाळ्याचा सण आहे. कोकणात या सणाला अगदी दिवाळी सणासारखा दर्जा आहे. मुंबईत स्थायिक झालेले अनेक कोकणवासी या सणाला लाखोंच्या संख्येने कोकणात गावी जातात. या काळात अनेक रेल्वे गाड्या कोकणाच्या दिशेला सोडल्या जातात. तरीही अनेक प्रवासी हे रस्ते मार्गाने देखील गावी जातात. रस्ते मार्गाने गावी जाणाऱ्यांसाठी सरकारने आता टोलमाफी केली आहे.

## वर्धा नदीच्या पूर पातळीची पाहणीसाठी जिल्हाधिकारी 'ऑनफिल्ड'



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** बामणी – राजूरा पुलावरील वाहतूक मंगळवार मध्यरात्रीपासून बंद करण्यात आली होती. बुधवारी सकाळपासून पाण्याची पातळी पुलाच्या खाली गेली असली तरी मोठ्या वाहनांना वाहतुकीसाठी प्रतिबंध करावा. पुलाच्या दोन्ही बाजुला पोलिस बंदोबस्त तैनात ठेवावा. पाणी पातळी कमी झाल्यावरच वाहतूक सुरू करावी. कोणतीही अप्रिय घटना घडणार नाही, याची यंत्रणेने काळजी घ्यावी, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या.

यावेळी जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, बल्लारपूरचे नायब तहसीलदार साळवे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता वैभव जोशी, पोलिस निरीक्षक विपीन इंगळे आदी उपस्थित होते.

शिवनी चोर परिसराला भेट :

जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी चंद्रपूर तालुक्यातील शिवनी चोर परिसरातील पूरग्रस्त भागाला भेट दिली. वर्धा नदीच्या बॅक वॉटरमुळे येथील परिसरातील पिके मोठ्या प्रमाणात पाण्याखाली आली आहेत. पूर ओसरल्यावर नुकसानग्रस्त शेतमालाचे पंचनामे अचूक पध्दतीने करावे. त्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करावे. पंचनामे करण्यात आलेल्या शेतीची व शेतकऱ्यांची यादी ग्रामपंचायतीमध्ये लावावी. तसेच पंचनामे करतांना संबंधित मालकाचे नाव व त्यांचा मोबाईल क्रमांक नोंदवावा, जेणेकरून नुकसान भरपाई देताना कोणतीही अडचण येणार नाही.

यावेळी उपविभागीय अधिकारी संजय पवार, नायब तहसीलदार ओंकार ठाकरे, मंडळ अधिकारी प्रवीण वरभे, तलाठी दिनेश काकडे, शिवनी चोरचे सरपंच रविंद्र पहानपट्टे आदी उपस्थित होते.

## पंढरपूर शहरातील भीमा नदी काठावरील १३७ कुटुंबाचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

### उजनी धरणातून १ लाख ५१ हजार ६०० तर वीर मधून १५ हजार ३२४ क्युसेक विसर्ग

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, पंढरपूर :** वीर व उजनी धरणातून सोडण्यात आलेल्या विसर्गामूळे भीमा नदीला पूर आला आहे. भीमा नदी इशारा पातळी ओलांडून धोकादायक पातळीवर वाहत आहे. उजनी धरणातून सायंकाळी ६ वाजता १ लाख ५१ हजार ६०० क्युसेक तर वीर धरणातील विसर्ग कमी करुन १५ हजार ३२४ क्युसेक करण्यात आला आहे. पंढरपूर येथील भीमा नदी १ लाख ४४ हजार ४९८ क्युसेकने वाहत असल्याने शहरातील भीमा नदी काठावरील १३७ कुंटुबाचे सुरक्षितस्थळी प्रशासनाकडून स्थलांतर करण्यात आले आहे.

संभाव्य आपत्तीचा धोका लक्षात घेवून तालुक्यात गावपातळीवर तसेच पंढरपूर शहरात आपत्ती निवारणार्थ यंत्रणा गतिमान केली आहे. यापूर्वीच्या आपत्ती धोक्याचा अभ्यास करुन त्या ठिकाणी आवश्यकती खबरदारी घेण्यात आली आहे. पाणी पातळीत वाढ झाल्याने तालुक्यातील नदीवरील आठ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. नदीवर दगडी पूल व गोपाळपूर येथील जुना दगडी



पूल पाण्याखाली गेला आहे. नदी काठावरील नागरिकांनी व पंढरपूर शहरातील नदीकाठावरील नागरिकांनी सतर्कता बाळगावी. तसेच आपत्तीकालिन परिस्थिचा मुकाबला करण्यासाठी लोकसहभागही महत्वाचा असल्याचेही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

शहरातील भीमा नदी काठावरील व्यास नारायण झोपडपट्टी येथील ८० कुटुंबांचे तर अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथील ५७ कुटुंबांचे आज दुपारी स्थलांतर करण्यात आले आहे. तर येथील ४०० पेक्षा जास्त लोक त्यांच्या सोईने इतरत्र त्यांच्या पै पाहुण्यांच्या घरी, नातेवाईकांच्या घरी स्थलांतरीत झाली आहेत. सायंकाळी ५ वाजता संगम येथून १ लाख ९५ हजार ८६१ विसर्ग सुरु असून, हा विसर्ग पंढरपूरात रात्री दाखल होणार असल्याने व्यास नारायण झोपडपट्टी व अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथील आणखी १०० कुटुंबांचे स्थलांतर करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

भीमा नदीला पूर आल्याने ४० हजार क्युसेकला कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पाण्याखाली गेले आहेत. तर १ लाख ७ हजार क्युसेकला पंढरपूर मंगळवेढा रोडवरील गोपाळपूर येथील जुना पूल पाण्याखाली गेला. तर १ लाख १५ हजार क्युसेकला व्यासनारायण झोपडपट्टीत पाणी शिरले आहे. तर १ लाख ६० हजार क्युसेकला गोपाळपूर येथील नवीन पुल पाण्याखाली जातो. तसेच १ लाख ८० हजार क्युसेकला संत पेठेत पाणी शिरते. सुरक्षेसाठी नागरिकांना प्रशासनाकडून वेळोवेळी सूचना देण्यात येत असून नागरिकांनी सूचनांचे पालन करावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विदर्भाला पूरधक्का, अनेक नद्यांना पूर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, नागपूर :** विदर्भात तीन दिवसांपासून पावसाचा जोर वाढल्याने गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या भामरागड तालुक्याला जोडणारा पर्लकोटा नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने शंभरावर गावांचा संपर्क तुटला. धरणांचा जलस्तर वाढल्याने धामचे २१, निम्न वर्धाचे १९, इसापूरचे १३ दरवाजे उघडण्यात आले आहे. या प्रकल्पांतून अधिक प्रमाणात विसर्ग सुरू असल्याने नदी काठावरील गावांमध्ये पुराचे पाणी शिरले. अनेक मार्गांवरील वाहतूक ठप्प पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. पुराच्या पाण्यात दोघे वाहून गेले. यातील एकाचा मृत्यू झाला असून दुसऱ्याचा शोध सुरू आहे. अकोला, बुलढाणा, वाशीम जिल्ह्यात पावसाचा जोर ओसरल्याने काहीसा दिलासा मिळाला. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुका छत्तीसगडच्या सीमेला लागून आहे. सोमवारी सायंकाळपासून छत्तीसगडसोबतच दक्षिण गडचिरोलीत पावसाची संततधार सुरू आहे. या पावसामुळे इंद्रावती नदीला आलेल्या पुराच्या दबावातून पर्लकोटाचा जलस्तर वाढला. नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने दोन्ही बाजूची वाहतूक बंद पडली. तालुक्यातील शंभरावर गावांचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क तुटला. भामरागड बसस्थानकालगत असलेल्या भागात पाणी शिरल्याने अनेक दुकाने आणि घरांमधील साहित्याचे नुकसान झाले. भामरागड तालुक्यातील पर्लकोटा, पामूलगौतम, इंद्रावती या तीनही नद्यांना पूर आल्याने दुर्गम भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. कोरची, कुरखेडा, देसाईगंज, अहेरी, भामरागड, एटापल्ली तालुक्यालाही पुराचा फटका बसला आहे. गडचिरोली जिल्ह्यात सोमवारी रात्रीपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पावसाचा जोर अधिक असल्याने नद्यांना पूर आला आहे. गडचिरोली शहरात रात्रभरात १७२ मिमी पावसाची नोंद झाली. शहरातील नगरपरिषद इमारत असलेल्या भागात पूर आल्याचे चित्र होते.

## वरवेली-निवोशी रस्ता उखडला; बांधकाम विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष !

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२१, निवोशी (गुहागर) :** संपूर्ण राज्यासह कोकणात झालेल्या मुसळधार पावसामुळे येथील जनजीवन विस्कळीत झाल्याच्या विविध घटना समोर येत असून मुसळधार पावसाचा फटका गुहागर तालुक्यातील निवोशी येथील जनतेला ही बसला आहे,गेल्या चार-पाच दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे वरवेली -निवोशी दरम्यान जोड रस्त्यावर वरवेली रांजाणेवाडी ते निवोशी रस्ता निवोशी गाव दिशेकडून जवळ जवळ पाचशे मिटर पेक्षा अधिक रस्ता हा पूर्णतः उखडला असून रस्त्यावर मोठमोठे चर पडल्याने येथील वाहतूक पूर्ण बंद आहे,परिणामी सदर रस्त्यावरून दैनंदिन व्यवहार व कामानिमित्त ये-जा करणाऱ्या ग्रामस्थ जनतेची मोठी अडचण निर्माण झाली आहे.

**२४ वर्षे लोटली रस्ता अजूनही डांबरीच्या प्रतीक्षेत!**

सदर रस्ता २००१ मध्ये पूर्ण झालेला असून आजपर्यंत २४ वर्षे झालीत वरवेली कडून फक्त एक कि.मी.रस्ता डांबरीकरण करण्यात आला आहे,उर्वरित पुढील रस्ता हा मातीचाच राहिला आहे, सदर रस्त्याची दुतर्फा झाडी साफसफाई व खड्डे बुजवणे हे काम निवोशी मधील नाणेवाडी, कातळवाडी, गणेशवाडीतील ग्रामस्थ दरवर्षी करत आहेत, परंतु सदर रस्त्याचे दुरुस्तीच्या कामांची बिल ठेकेदारांना हाताशी



धरून संबंधित यंत्रणेचे अधिकारी खर्च झालेले दाखवून बिल कसे काय पेड करतात ? असा प्रश्न निवोशी गावचे सामाजिक कार्यकर्ते विजय अवेरे यांनी उपस्थित केला आहे.

**प्रशासनाची थातुर-मातुर उत्तरे आणि लोकप्रतिनिधींनीचे जाणून-बुजून दुर्लक्ष!**

याबाबत निवोशीतील स्थानिक जागृत विकास मंडळाचे अध्यक्ष विजय अवेरे हे मागील १० वर्षापर्यंतची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागवणार असल्याचे आणि त्याबाबत आवाज उठवणार असल्याचे विजय अवेरे यांनी सांगत संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता सदर कामा करीता आमच्याकडे कोणताही निधी नाही अशी थातूरमातूर उत्तरे दिली जात असून सदर रस्त्यांकडे लोकप्रतिनिधी सुद्धा जाणून-बुजून दुर्लक्ष करत असल्याचे विजय अवेरे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना सांगितले,त्याचप्रमाणे मळण ते निवोशी -पालशेत रस्त्याचीही दुरावस्था झाली असून सदर रस्त्याची दुतर्फा झाडी साफसफाई करणे, खड्डे बुजवणे ही कामे दरवर्षी मळण तळेकोंड, निवोशी नाणेवाडी,कातळवाडी, गणेशवाडी व भेलेवाडी मधील ग्रामस्थ दरवर्षी करत असतात परंतु संबंधित (पीडब्ल्यूडी) बांधकाम विभाग या कामांची बिल ठेकेदारांना काढत असतात, मात्र प्रत्यक्षात निवोशी विभागात अशी कामे होताना दिसत नाहीत,याबाबत निवोशी ग्रामस्थ जनतेकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. गुहागर तहसीलदार यांनी याबाबत संबंधित यंत्रणेला योग्य त्या सूचना देऊन वरवेली-निवोशी उखडलेला रस्त्याच्या कामी त्याचबरोबर मळण ते निवोशी -पालशेत रस्त्याच्या दुरावस्थेबाबत गांभीर्याने दखल घेऊन सदर रस्त्यांची देखभाल दुरुस्ती सह वरवेली-निवोशी रस्त्याची लवकरात लवकर दर्जोन्नती करण्यात यावी अशी अपेक्षा व मागणी ग्रामस्थ जनतेकडून होत आहे.




## आभाळ फाटले...

गेल्या चार दिवसांच्या मुसळधार पावसाने मुंबईपासून ते विदर्भापर्यंत जवळपास संपूर्ण महाराष्ट्राची केविलवाणी स्थिती करून टाकली आहे, त्याला निसर्गाच्या अवकृपेइतकीच प्रशासन यंत्रणांची निष्क्रियताही कारणीभूत आहे.

अतिवृष्टीने मुंबईचे जनजीवन विस्कळित केले, तर मराठवाड्यात नांदेडमध्ये मुखेड तालुक्यात आजवर कधीच झाला नव्हता, इतक्या पावसाने नागरिकांची घरेदारे उद्ध्वस्त करून टाकली. राज्यभरात गेल्या पाच दिवसांत २९ बळी गेले, त्यापैकी ११ मराठवाड्यातील आहेत. राज्यातील अनेक शहरांमध्ये या पावसात रस्त्यांनी ओढ्यानाल्यांचे रूप धारण केले आणि राज्यात ठिकठिकाणी नद्यांनी काठांवरून नागरी वस्त्यांमध्ये धाव घेतली. राज्यातील बारा लाख हेक्टर शेती बाधित झाली असून आता ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होऊ लागली आहे. केवळ सहा तासांत दोनशे मिलिमीटर, तर २४ तासांत साडेतीनशे मिलिमीटर अशा पावसाने मुंबईकरांना २६ जुलै २००५ ची आठवण करून दिली. पावसाच्या या तडाख्यातून कोणीही सुटले नाही. रुळांवर पाणी साचल्याने रेल्वे रद्द झाल्या, रस्त्यांवर साचलेल्या कमरेइतक्या पाण्यात बस-रिक्षासह वाहने अडकली, ' मोनोरेल ' खांबावरच बंद पडून प्रवाशांचे प्राण कंठाशी आले, तर धावपट्टीवर पाणी साचल्याने विमानांनाही हवेतच चकरा माराव्या लागल्या. ही निसर्गाची अवकृपा खरीच; पण केवळ त्याकडे बोट दाखवून राज्यकर्ते आणि प्रशासनाला मोकळे होता येणार नाही. 'मुंबई स्पिरिट'च्या गोंडस नावाखाली दर पावसाळ्यात अनन्वित हाल सहन करणाऱ्या मुंबईकरांची आणखी किती परीक्षा पाहणार, याचे उत्तर देण्याची वेळ आली आहे. रेल्वे स्थानकांवर गर्दीत गुदमरणाऱ्या चाकरमान्यांना आणि घरांत पाणी शिरल्याने उद्ध्वस्त झालेल्या संसाराकडे हताशपणे पाहणाऱ्या मुंबईकरांना 'रेड' किंवा 'ऑरेंज' ॲलर्टविना सरकार काहीही देऊ शकत नाही, ही स्थिती प्रगतिशील महाराष्ट्राला शोभणारी नाही. मिठी नदीतील गाळ काढणे किंवा नालेसफाईचे पितळ या एकाच पावसाने उघडे पाडले. समुद्राला आलेली भरती, हे नैसर्गिक कारण; पण अपुरी ड्रेनेजव्यवस्था आणि मुंबईसह अनेक शहरांमध्ये रस्त्यांवर- गल्लीबोळांमध्ये जागा मिळेल, तेथे काँक्रिट ओतून पाणी जमिनीत मुरण्यास अटकाव करण्याचा अट्टहासही शहरांच्या मुळावर येत आहे. प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे पाणी वाहून जाण्यास आपण अडथळा निर्माण करीत आहोत, हे नागरिकांनीही लक्षात घेतले पाहिजे. मराठवाड्यातही नांदेड, बीडसह आसपास पावसाने दणका दिला. आयुष्यात इतका पाऊस पाहिला नव्हता, असे मुखेड तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक सांगतात. तरीही काठावरील गावांचे पुनर्वसन करण्यापूर्वीच लेंडी प्रकल्पाची घळभरणी करण्याच्या घाईमुळे अडवलेले पाणी गावांत शिरून मोठ्या दुर्घटनेला सामोरे जावे लागल्याचा नागरिकांचा आरोप आहे. त्याचीही चौकशी झाली पाहिजे. या पावसाने राज्यातील बारा ते चौदा लाख हेक्टरवरील उभ्या पिकांना फटका बसल्याची प्राथमिक माहिती आहे, तर कोकणातील अनेक गावे दरड कोसळण्याच्या भीतीच्या छायेखाली जगत आहेत.

पावसाचा अंदाज देणारी यंत्रणा अधिक अद्ययावत आणि अचूक असणे किती गरजेचे आहे, याची जाणीव या निमित्ताने होते; त्याबरोबरच निसर्गावर किती अतिक्रमण करायचे, याचीही मर्यादा आखून घेतली पाहिजे. राज्यातील अनेक शहरांत थेट नदी-ओढ्यांची पात्रे अडवून-वळवून अतिक्रमण झाले आहे, ठिकठिकाणी डोंगर फोडून केलेली विकासकामे दरडींना निमंत्रण देत आहेत.

पश्चिम घाट वाचविण्यासाठी तज्ज्ञ देत असलेल्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून होणारा हा तथाकथित विकास नागरिकांचा काळ ठरू नये. तसेच या संकटकाळातही राजकारण करण्याची खोड अनेकांना जडली असून 'तुमच्या काळात किती पाणी साठले आणि आमच्या काळात काय झाले,' या आरोप-प्रत्यारोपांना आवर घातला पाहिजे. लष्कर, एनडीआरएफ, सरकार आणि स्थानिक प्रशासन सध्या बचावकार्यात गुंतले आहे. बाधितांची घरेदारे पुन्हा उभी करणे, नुकसानाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देणे, ही काळाची गरज आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे; त्याबाबतही साधकबाधक विचार करून सरकारने तिजोरी खुली करावी. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडातील भयकारी घटनांनंतर काही दिवसांतच महाराष्ट्रात आलेल्या या पूरस्थितीने हे संकट आपलेही दार ठोठावत आहे, याचे भान ठेवले पाहिजे.

# बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा 'बैलपोळा'



बैलपोळ्याचा दिवस हा शेतकऱ्यांची बैलांविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस होय आणि ही कृतज्ञता या 'पोळा' सणाच्या निमित्ताने आम्ही भारतीय सातत्याने जोपासत आलेलो आहोत. भारतीय संस्कृती मनुष्या सोबतच निसर्ग आणि प्राणीमित्रांची देखील पूजा करायला शिकवते. अलीकडे खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या आडून पशुपालकांसह शेती करणारा शेतकरीवर्ग हा देशोधडीला लागलेला आहे, याची जाण शासनानी ठेवली पाहिजे. त्यातूनच त्याची दिवसेंदिवस होत असलेली कुचंबना व आत्महत्या ही योग्य नाही. जर जगवणाराच जर जगला नाही, तर एक दिवस स्वदेशीचा ठेंभा मिरवणाऱ्या भारतीयांना विदेशी अन्नाशिवाय जगणे कठिण होऊन बसेल हे विसरता येणार नाही.

'पोळा' हा सण श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्याच्या दिवशी येतो या महिन्याची सुरुवात होताच अनेक सण उत्सवांची रेलचेल सुरू होते. पावसाचे दिवस असल्याने सृष्टीचे सौदर्यही खुलून दिसते. अशा या श्रावणात नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांनंतर सरत्या श्रावणात येतो बैल पोळ्याचा सण. संपूर्ण महाराष्ट्रात आजही मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा.' शेतकरी बांधवांसाठी पोळा या सणाचे महत्व खूप आहे. शेतीतील बैलांच्या महत्त्वाची आठवण करून देणारा हा सण दोन शतकांहून अधिक काळापासून चालत आलेली परंपरा आहे. या दिवशी वर्षभर शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या बैलाची पूजा केली जाते. या सणाची शहरापासून तर गावापर्यंत धूम असते. परंतु या सणाचे विशेष आकर्षण गावांमध्येच पहावयास मिळते. वर्षभर शेतात कष्ट करून राबणाऱ्या आणि शेतकऱ्याचा खांद्याला खांदा लावून शेतीत मदत करणाऱ्या बैलाला या दिवशी पुजले जाते. त्याचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.

ज्यांच्या घरात बैलजोडी नसते ते लोक माती व लाकडाचे बैल देखील पूजतात. बैलपोळ्याचा सण हा शेतीवर आधारित आहे व हा सण आपल्या बैलांचे व शेती तसेच शेतकऱ्यांच्या कामी येणाऱ्या प्राण्यांचे महत्त्व सांगतो. निसर्ग, मनुष्य आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये देव आहे व यांची पूजा हीच देवाची पूजा होय, याची जाणीव हा सण आपणांस करवून देतो. पोळ्याच्या काळात शेतकरी शेतात बैल पाळत नाहीत आणि त्या दिवशी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शाळांना सुट्टी असते. फार प्राचीन परंपरेतील विशेषत: पशुपालक शेतकरी वर्गाने हजारो वर्षांपासून जोपासलेला पोळा हा सण. पशुपालन अवस्थे नंतर कृषक अवस्थेत आलेल्या प्राचीन मानव समूदायाचा हा सण. भूमी आणि भाकरीसाठी राबराब राबणाऱ्या श्रमसंस्कृतीचे ते प्रतीक आहे. शेतकरी व शेतमजूराचा सच्चा साथीदार म्हणजे बैल. हे तिन्ही घटकांची परस्पर पुरकता ही अन्नासह अर्थार्जन निर्मितीसाठी देशाचा मूख्य आधारस्तंभ ठरते. आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजशृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात. गावाच्या सीमेजवळच्या शेतावर आंब्याच्या पानाचे एक मोठे तोरण करून बांधतात. या सणाच्या दिवशी महाराष्ट्रातल्या खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते व त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' म्हणायची पद्धत आहे, त्यानंतर 'मानवाईक' ज्याला गावात मान आहे ती व्यक्ति, गावचा पाटील किंवा श्रीमंत जमीनदार तोरण तोडतो व पोळा 'फुटतो' नंतर बैल मारुतीच्या देवळात नेतात व नंतर घरी नेऊन त्यांना ओवाळतात. बैल नेणाऱ्यास 'बोजारा' देण्यात येतो, शेतकरी वर्गात हा सण महत्त्वाचा मानला गेल्याने या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये विशेष उत्साह व आनंदाचे वातावरण असते.


भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रात व त्यातल्या त्यात विदर्भात, पोळा हा एक शेतकऱ्यांचा मोठा सण आहे. त्या दिवशी बैलांना कामकाजापासून सुट्टी असते. त्या दिवशी बैलांना न्हाऊ-माखू घालतात. त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घालतात, त्यांना सजवतात व मिरवतात. त्या दिवशी त्यांची घरोघरी पूजा होते. गावातील शेतकरी सकाळपासूनच बैलपोळ्याच्या तयारीला सुरुवात करून देतो. या दिवशी सर्वात आधी शेतकरी भल्या पहाटे उठून बैलांच्या गळा आणि नाकातील दोर काढतात. या दिवशी शेतकरी आणि त्यांचे कुटुंब बैलांना धुणे, शिंगे रंगवणे, जुने दोर बदलून नवीन बांधणे, नवीन घंटा बांधणे आणि त्याचा साजशृंगार करतात. यानंतर त्यांना सजवून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी बैलाच्या खांद्याला हळद व तुपाने किंवा तेलाने शेकतात. याला 'खांद शेकणे' अथवा 'खांड शेकणे' म्हणतात. बैलाच्या पाठीवर नक्षीकाम केलेली पाठीवर घालायची झुल, सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात चांदीचे व करदोड्याचे तोडे घालुन त्याला खायला सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात. काही ठिकाणी बाजरी ची खिचडी सुद्धा बैलांना खाऊ घातली जाते. सायंकाळच्या वेळी गावातील सर्व लोक आपापल्या बैलांना घेऊन गावाच्या मोकळ्या चौकात जमतात. बैलपोळ्याच्या दिवस शेतकरी आणि शेतात काम करणारे बैल व इतर सर्व प्राण्यांच्या विश्रांतीचा दिवस असतो, म्हणून या दिवशी कोणतेही काम केले जात नाही. यानंतर संध्याकाळच्या वेळी घरातील महिला आपापल्या बैलाची आरती ओवाळून पूजा करतात. ढोल ताशांच्या गजरात त्यांची मिरवणूक काढली जाते. घरातील स्त्रिया स्वादिष्ट व्यंजन, पुरणपोळी व शिरा बनवतात व बैलांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. बैलाची निगा राखणाऱ्या 'बैलकरी' घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात.

जेव्हा कोणताच धर्म अस्तित्वात आलेला नव्हता तेव्हा पासूनच प्राचीन भारतीय मानव समुदायाने बैलपूजनाची परंपरा जोपासलेली होती हे सिंधू संस्कृतीतील उत्खननातून सिद्ध झालेले आहे. बैल हे श्रमाचे प्रतीक, त्याच्याकडून वर्षभर काम करून घेत असतांना त्याच्या या ऋणाईतून उत्तराई होण्याचा हा दिवस म्हणून 'पोळा' हा सण साजरा करण्याची ही प्रथा ग्रामीण जीवनात कायम आहे. अलीकडे जरी ट्रॅक्टरद्वारे शेतीची कामे केली जात असली तरी बैलाचे महत्त्व जनमानसात आजही कमी झालेले नाही. वर्षभर शेतकऱ्यांचा सखा बणून राहणाऱ्या या बैलांच्या अपार श्रमातून देशातील तमाम मानवास रोजगार, अन्नधान्य व भोजन मिळते. परंतु या सणानिमित्त पळस या झाडांच्या फांद्या दारासमोर, गोठ्यात, शेतात ठेवण्याचीही परंपरा असल्यामुळे लाखो झाडांची तोड या दिवसावर होते. अवकाळी पाऊस, दुष्काळ या निसर्गाच्या लहरीपणातून शेतकरी व पशुपालकांचा जीव आधीच मेटाकुटीला आलेला असतांना त्यात अशा सणोत्सवाच्या निमित्ताने होणारी वृक्ष तोड योग्य नाही, पर्यावरणाचा ऱ्हास करणारी ही पळस तोड थांबायला हवी.

रक्ताचे पाणी करणारा शेतकरी आत्महत्या करतो, उपाशी झोपतो तर या मंदीरात देव-धर्माचे अवडंबर माजवणारा पुजारी, पुरोहित, पंडीत चैनीने तुपाशी खातो हे वास्तव म्हणजे या देशाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. या देशात गाय ही गोमाता ठरवली जाते, परंतू बैल पिता ठरत नाही. मदिरात मात्र दान-दक्षिणा ऐटण्यासाठी गोमाता नव्हे तर नंदी बैलाचीच प्रतीकृती हवी असते ही विसंगती जोपासणारेच जर संस्कृती व धर्मरक्षक बणून मानवाच्याच जीवावर उठत असेल तर आमच्या धडावर आमचेच डोके व आमचाच मेंदू असल्याशिवाय खरी संस्कृती व खरा धर्म याची सत्यता कळणार नाही. कष्टाशिवाय व्यक्तीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही, सर्वांना बैल पोळ्याच्या अनेक शुभेच्छा !

**- प्रविण बागडे**
**नागपूर, ९९२३६२०९१९**

### पर्यटन...



पूर पर्यटनांस पहा
निघती आता लोंढे
जनतेचा कळवळा
भोवतीघोळत गोंडे

बनवू लाईव्ह रिल्स
बघ्यांचे सर्वत्र तांडे
संवेदनशीलव्यापार
कसलाबाजार मांडे

जवळ जाऊ देईना
पोलिसांसोबतभांडे
पूर ग्रस्त लाजे सारे
लपवू लागती भांडे

मदत कार्य प्रदर्शन
हातात पक्षीय झेंडे
कसे होई कनवाळू
कडक कातडी गेंडे

प्रसिद्धीप्राप्तीसाठी
शोधे नवनवीनफंडे
नेटकरीची जादुगरी
हे विचित्र हात खंडे

ब्रेकिंग लाईव्हन्यूज
कॅमेरे शोधार्थ हिंडे
मदत नको गर्दी पुरे
श्वासमध्यातचं कोंडे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो. ९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# शहरांचे योग्य नियोजन करा नाही तर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना




मुसळधार पावसाने मुंबईसह नवीमुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यात हाहाकार उडवला. मुंबई उपनगरात २४ तासात २३८.२ मिलिमीटर पाऊस झाला तर ठाणे शहरात १३३ मिलिमीटर पाऊस पडला. मुंबई शहरातही ११० मिलिमीटर इतका पाऊस झाला.

कोकणातही पावसाने अशीच तडाखेबंद हजेरी लावली. केवळ मुंबई, ठाणे आणि कोकणच नव्हे तर संपूर्ण राज्यात पावसाने दाणादाण उडवली. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. नाशिकमध्येही पावसाने कहर केला. विदर्भात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना पावसाने तडाखा दिला तीच परिस्थिती मराठवाड्यातही झाली एकूणच पावसाने सपूर्ण राज्यात कहर केला. गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने असे रौद्ररूप धारण केले की सर्वांचीच पाचावर धारण बसली. या पावसाने मोठ्या प्रमाणात वित्तहानी तर झालीच पण काही ठिकाणी जीवितहानी देखील झाली. काहींना आपला जीव देखील गमवावा लागला.

नद्या, नाल्यांना पूर आला. अनेकांचा संसार पाण्यात बुडाला, शेतीवाडी पाण्याखाली गेल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेल्याने बळीराजा हताश झाला. क्षणात होत्याचे नव्हते झाले. देशाची आर्थिक राजधानी असलेली आणि कधीही न थांबणारी मुंबईही या पावसाने काही काळ ठप्प झाली. या पावसाने मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली. जोरदार पावसाने मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले. शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. पावसामुळे शासकीय आणि अशासकीय कर्मचाऱ्यांना देखील शासनाने सुट्टी दिली. जागोजागी पाणी तुंबल्याने रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले. लोकांच्या घरात पाणी आले. त्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. शेकडो गाड्या जाग्यावरच थांबल्या त्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. काही ठिकाणी दरड कोसळल्याने महामार्ग बंद झाले. रेल्वे मार्गावर पाणी साचून रुळ पाण्याखाली गेल्याने लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या. लांब पल्ल्याच्या गाड्याच नाही तर अनेक लोकलही रद्द कराव्या लागल्या. काही मार्गावर धीम्या गतीने लोकल सोडाव्या लागल्या.

पावसाचे पाणी रेल्वे स्थानकावरून धबधब्याप्रमाणे ओसंडून वाहत होते. पावसामुळे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे तांत्रिक बिघाड झाल्याने मोनोरेल जाग्यावरच थांबली. त्यात शेकडो प्रवासी अडकले. आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशामक जवानांच्या पथकाने आपली जबाबदारी चोख पार पडल्याने प्रवाशांची सुरक्षित सुटका झाली. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणूनच प्रवाशांचा जीव वाचला. या पावसाने २६ जुलै २००५ ला मुंबईत झालेल्या पावसाची आठवण करून दिली. त्यावेळी झालेल्या पावसात देखील मुंबईची अशीच अवस्था झाली होती. २६ जुलैच्या पावसानंतर आपण कोणताही धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. २६ जुलैला निसर्गाने शहरांचे योग्य नियोजन करा नाहीतर नैसर्गिक आपत्तीचे बळी बना असा इशारा देऊन धडा शिकवला होता तरीही त्यातून आपण काहीही शिकलो नसल्याने दरवर्षी ये रे माझ्या मागल्या असेच चालू आहे.

शहरीकरण करताना नागरी नियोजनाची आखणी न केल्याने शहरांच्या सीमा वाढत गेल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. नियोजनाचा आराखडा तयार न करता कागदावरील नकाशाच्या सीमा वाढवून महानगराची मांडणी करणारे शासन आणि प्रशासन याला जबाबदार आहे. मुबई पुण्यासारख्या मोठ्या शहरांच्या सीमा विस्तारित चालल्या आहेत. या शहरात दरवर्षी नव्या गावांची भर पडत आहे. नगर नियोजनाकडे गांभीर्याने न पाहता नागरीकरणाचा निर्णय घेतल्याने ही पूरस्थिती निर्माण झाली. शहरांच्या विस्तारण्याच्या शहरीकरणात पर्जन्यवाहिन्या, मलनिस्सारन अशा विविध विभागांचे एकत्रीकरण करून नियोजनाची मांडणी करण्याची प्राथमिकताही पूर्ण केली जाते का असाही प्रश्न निर्माण होतो. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद आणि एमएमआरडीए यांचा एकत्र मेळ बसत नसल्याने शहरांचे नियोजन कोलमडत आहे. उघडी गटारी, तुंबलेले नाले, अनधिकृत बांधकामे, अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या, सिमेंटची वाढती जंगले, सिमेंटची रस्ते, जागोजागी बसवलेली पेव्हिंग ब्लॉक्स या सर्वांचा एकत्रित परिपाक म्हणजे ही पूरस्थिती. सरकारने आतातरी जागे होऊन शहर नियोजनाचा योग्य निर्णय घ्यावा अन्यथा भविष्यात यापेक्षाही भीषण परिस्थितीला सामोरे जागे लागेल.



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ग्रामसभेत विज वितरण, रस्ते, जलजीवन प्रश्नासह विविध विषयांवर चर्चा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतची स्वातंत्र्यदिनी घेतली जाणारी ग्रामसभा नुकतीच गावाच्या वेशीबाहेर पारावर सरपंच अरुणा खिलारी यांच्या अध्यक्षतेखाली गावातील विविध विषयांवर चर्चा करून पार पडली. सभेच्या सुरुवातीला ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब दावभट यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचण केले. टाकळी ढोकेश्वर बालविवाहमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे तसेच गावामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवड करणे, जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेबाबत चर्चा करणे, टीबी मुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी राबवणे, नागरिकांना ग्रामपंचायतीच्या आपले सरकार सेवा केंद्रातून शासकीय विभागाच्या सेवा नागरिकांपर्यंत पोहोच करणे, घनकचरा विलगीकरण व सांडपाणी व्यवस्थापन याबाबत विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये जनजागृती करणे. विकसित महाराष्ट्राबाबत अभिप्राय नोंदवणे, अशा विविध विषयांवर ग्रामसभा घेण्यात आली. तलाठी कार्यालयाचे कोतकर यांनी ग्रामस्थांना जिवंत सातबारा, फार्मर आयडी व शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. पशुसंवर्धन अधिकारी सुनील शिदोरे यांनी शेतकऱ्यांना जनावरांना लंम्पी आजाराचा प्रादुर्भाव याबाबत माहिती दिली. त्यानंतर गावातील विविध प्रश्नांसंर्दभात अनेक वक्तृयांनी चर्चा केली.

जलजीवन पाणीपुरवठा योजनेचा विषय निघाल्यावर या ग्रामसभेस जलजीवन पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेचे ठेकेदार आणि अधिकारी का उपस्थित नाहीत? असा सवाल माजी सरपंच शिवाजी खिलारी यांनी केला. जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे पाईप ढोकेश्वर रस्त्याच्या कडेने टाकून नळ जोडणी देण्यात आल्यामुळे भविष्यात नळ कनेक्शन गळती झाल्यास पुन्हा पक्के रस्ते खोदावे लागणार आहे, गावातील जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याचा मुद्दा खिलारी यांनी उपस्थित केला. जाधव वस्तीवरील पथदिवे, शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न,रोजगार हमी योजनेअंतर्गत, घरकुल योजना, शेती पांदण रस्ते आदी विषयांवर सखोल चर्चा होऊन ठराव करण्यात आले.

यावेळी सरपंच अरुणा खिलारी, ग्राम पंचायत सदस्या सुग्राबी हवलदार, इंदूबाई पायमोडे, खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, माजी सभापती विलास झावरे, माजी सरपंच शिवाजी खिलारी, ग्राम पं. सदस्य बापूसाहेब रांधवण, ग्राम,पं. सदस्य दत्तात्रय निवडुंगे, बंटी जाधव, संकेत झावरे, सुभाष भांडे यासह शासकीय अधिकारी उपस्थित होते.

## टाकळी ढोकेश्वर परिसरात बैलपोळ्याची लगबग



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** बैल जोडी आणि शेतकरी हे समीकरण अनादी काळापासून शेतकऱ्यांचे व बैलाचे होते. परंतु वाढत्या आधुनिकीकरणामुळे व शेतीचे तुकडे झाल्यामुळे म्णा की, ट्रॅक्टर शेतकऱ्याच्या सोबतीला आल्याने शेतातील कामे या यांत्रिकीकरणामुळे होऊ लागली असली तरी ग्रामीण भागात आजही शेतकऱ्याचा हक्काचा मित्र असलेला बैलांचे महत्त्व टिकून आहे. आजही अनेक शेतकरी बैलांच्या साह्याने शेती करतात. आधुनिक काळात बैलजोडी मागे पडत गेला व त्याची जागा ट्रॅक्टरने घेतली. पावसाच्या आगमनानंतर बैलपोळ्यासाठी तालुक्यातील ग्रामीण भागातील टाकळी ढोकेश्वर परिसरातील शेतकरी वर्ग पारंपरिक बैलपोळा सण उत्साहात साजरा केला जातो. आज साजरा होणाऱ्या बैलपोळ्यासाठी बाजारपेठ सज्ज झाली आहे.

दरम्यान सर्जा राजाला सजवण्यासाठी टाकळी ढोकेश्वर गावच्या मुख्य चौकात झुल, रंगीबेरंगी दोर, गौंडे, माथोटी, गळ्यातील विविध माळा, घुंगरू, वेसण, मोरखी, झूल शिंगे रंगविण्यासाठी अनेक प्रकारचे रंग आदी साहित्य विक्रीसाठी स्टॉल लागले आहेत. खरेदी करण्यासाठी शेतकरी वर्ग गर्दी करतांना दिसून येते आहे.

## प्रतिबंधित अन्नपदार्थ साठा जप्त; टिळकनगर पोलिसांची कारवाई



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२१, डोंबिवली (ठाणे) :** टिळकनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने डोंबिवली (पूर्व) परिसरात मोठी कारवाई करत एकूण ३४ प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा, किंमत रुपये २,२५,४७१/- असा जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मजकूर याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी प्रतिबंधित अन्नपदार्थ साठवून ठेवले होते. हे पदार्थ विक्रीसाठी साठवले असून, त्याविरुद्ध अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम २६(२)(ळीं), २७(३)(व), ३०(२)(र), ५९ तसेच भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम २७४, २७५, १२३ सह कलम ३(५) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच अन्न सुरक्षा आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना क्र.असुमाअ/अधिसूचना/४११/२०२५/७ दि. १६ जुलै २०२५ चा भंग केल्याचे ही पोलिसांनी नमूद केले आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम आणि पोलीस निरीक्षक गुन्हे दत्तात्रय गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल विसपुते, पोउपनिरीक्षक आर.वाय. चौगुले, सपोनि/डी.पी. गणगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांच्या आदेशानुसार पथकाने ही मोहीम राबवली. पोलिसांनी जप्त केलेल्या अन्नपदार्थांचा पंचनामा करून पुढील तपास सुरू आहे.

## सद्भावना दिवस निमित्ताने पनवेल मनपा मुख्यालयात प्रतिज्ञा

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.२१, पनवेल :** दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयात सद्भावना दिवस प्रतिज्ञा देण्यात आली. जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची, तसेच सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गांनी सोडवण्याची प्रतिज्ञा, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर यांनी उपस्थितांना दिली. यावेळी महापालिका सचिव अक्षय कदम, महापालिका अधिकारी व कर्मचारी तसेच विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पावसामुळे नुकसानीचे पंचनामे करून भरपाई द्या; खा.लंकेंचे जिल्हाधिकार्यांना पत्र

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सलग आणि अतिवृष्टीसमान पावसामुळे शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी जिल्हाधिकार्यांना पत्र लिहून तातडीने पंचनामे करून शेतकर्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

खासदार निलेश लंके यांनी पत्रात नमुद केले आहे की, तूर कपाशी, सोयाबीन, मका, वाटाणा यांसह



खरिपातील इतर पिके पावसामुळे पाण्याखाली गेली आहेत. काही भागांत दुष्काळसदृश परिस्थितीत पिके खुंटलेली असतानाच अचानक झालेल्या पावसाने शेतकर्यांच्या आशा पाण्यात गेल्या. विशेषतः शेवगांव तालुक्यातील खामगांव, हिंगणगांव, गुंफा, जोहरापूर, भातकुडगांव तसेच राहुरी, नगर, पारनेर, शीगोंदा, कर्जत, जामखेड व पाथर्डी तालुक्यातील अनेक गावांतील शेतकर्यांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी असल्याचे खा. लंके यांनी जिल्हाधिकार्यांच्या निदर्शनास आणून दिले.

खा. लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे की, शेतकर्यांनी मोठ्या खर्चाने खते व औषधे टाकून पिके उभी केली होती. मात्र, अतिवृष्टीमुळे कपाशी पिवळी पडली, सोयाबीनची फुले गळून पडली तर तूर व वाटाणा पूर्णपणे उध्वस्त झाले आहेत.

यामुळे शेतकरी हवालदिल झाले असून या नुकसानीचे पंचनामे न झाल्याने शेतकरी रोष व्यक्त करत आहेत. जिल्हाधिकार्यांना दिलेल्या पत्रात खा. लंके यांनी स्पष्ट केले आहे की, महसूल व कृषी विभागाने तातडीने नुकसानग्रस्त भागात जाऊन पंचनामे करावेत व शासनस्तरावरून शेतकर्यांना त्वरीत नुकसानरपाई मिळावी. शेतकर्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे, त्यामुळे तात्काळ दिलासा मिळणे गरजेचे आहे असे त्यांनी नमूद केले आहे.

## मराठा मोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या; खा.सोनवणे भेटले गडकरींना

### मराठा समाजाच्या मोर्चासाठी दिले MSRDC आणि NHAI ला पत्र

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२१, बीड :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे. यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई मोर्चा निमित्त बीड जिल्ह्यासह राज्यभरातून मुंबईकडे लाखो वाहने येणार आहेत. या वाहनांमधून युवक, शेतकरी, कष्टकरी येणार असून त्यांच्यावर आर्थिक भार पडू नये. यासाठी त्यांच्या वाहनांना टोल माफी देण्यात यावी. अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महाम र्ग, मुंबई यांना पत्र दिले असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवून ही मागणी केली आहे.

मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोंकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना



दिलेल्या पत्रात म्हटले आहे, दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या मुंबई येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी बीडसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने नागरिक मुंबईकडे प्रवास करणार आहेत.

या प्रवासासाठी हजारो वाहने म ुबईकडे येणार असून त्यामुळे मार्गावरील टोल नाक्यांवर मोठी गर्दी होणार आहे. तसेच प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार येणार आहे. शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिक स्वयंस्फूर्तपणे या आंदोलनात सहभागी होत असल्यामुळे त्यांच्यावर जादा खर्च पडू नये. यासाठी त्या कालावधीत मुंबईकडे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी.

या निर्णयामुळे जनतेला आर्थिक दिलासा मिळेल, टोल नाक्यांवरील गर्दी कमी होईल व वाहतूक व्यवस्थापन सुलभ होईल म्हणून या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, असे म्हटले आहे. मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कोकण-भवन, मुंबई व व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय महामार्ग, मुंबई यांना पत्र दिल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची देखील भेट घेतली.

यावेळी मराठा समाजाच्या म ोर्चासाठी येणाऱ्या वाहनांना टोल माफीचा निर्णय घेण्यात यावा, तसे आदेश आपण द्यावेत, अशी मागणी ही केली. यावेळी दोघात टोलमाफिच्या विषयावर सकारात्मक चर्चा झाली आहे.

**समाजासाठी पत्र देणारे पहिले लोकप्रतिनिधी**

राज्यात मराठा आरक्षण प्रश्नी वातावरण तापलेले आहे. दि.२९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन होत आहे. यासाठी ग्राम ीण भागातून येणाऱ्या गरीब मराठा समाजावर आर्थीक भार पडू नये. यासाठी टोलमाफीचे पहिले पत्र केंद्रीय मंत्री तसेच चडठ्ठ व छक्अख यांना दिले आहे. असे पत्र देणारे खा.बजरंग सोनवणे हे पहिले लोकप्रतिनिधी आहेत.

## पूल पडल्यावरच प्रशासन जागे होणार का? - ग्रामस्थांचा संतप्त इशारा

### वडूथ, वाढे पुलांना संभाव्य धोका

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२१, सातारा :** लोणंद मार्गावरील वडूथ व वाढे येथील नदीवरील १८० वर्ष जुने ऐतिहासिक पूल आज अक्षरशः धोक्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत. कृष्णा नदीवरील दगडी पूल वास्तुशास्त्राचे वारसा स्थान असले तरी, पुलावर पडलेले प्रचंड खड्डे, वाढलेली झाडे आणि संरक्षण भिंतीचा अभाव यामुळे पुल कोसळण्याचा धोका टाळता येणार नाही, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यात अवजड वाहतूक सुरूच ठेवली गेल्याने या पुलाचा जीव धोक्यात घातला जातोय, असा थेट आरोप करण्यात आला.

पूल पडून जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? कितीही निवेदनं दिली तरी अधिकाऱ्यांना जनतेचे दुःख दिसत नाही. ते फक्त एसी



गाड्यांत बसून फिरतात. पण आता आम्ही गप्प बसणार नाही. अवजड वाहतूक त्वरित बंद झाली नाही, दुरुस्ती झाली नाही तर ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र रास्ता रोको करतील आणि त्यातून उद्भवणाऱ्या गोंधळ, अपघाताची संपूर्ण जबाबदारी जिल्हा प्रशासनावरच असेल, असा आक्रमक इशारा भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सचिव आणि उदयनराजे मित्र समूहाचे वडूथ अध्यक्ष मदन साबळे यांनी दिला.

गावकऱ्यांचा रोष इतका तीव्र झाला आहे की, आमची सहनशक्ती संपली आहे, यापुढे काही अनुचित घडल्यास शासनाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे. यापूर्वी वडूथ, वाढे, आरळे, शिवथर, आरफळ या गावांनी अनेकदा निवेदनं देऊन पुलांची दुरुस्ती, वाहतूक बंदीची मागणी केली होती. मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केले. त्यामुळे वडूथ, वाढे ग्रामस्थांमध्ये आता प्रचंड संताप असून कारवाई करा नाहीतर आंदोलन ठरलेलंच असा अंतिम इशारा देण्यात आला आहे.

## मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाजणार नाही डॉल्बी

## शांतता कमिटी व सर्वपक्षीय प्रमुखांच्या बैठकीत निर्णय

**अक्षराज : शिवराज मुगले**

**दि.२१, सोलापूर :** मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावांमध्ये गणेशोत्सवासह वर्षभरात साजरे होणारे सर्व महापुरुषांची जयंतीच्या मिरवणुकीत डॉल्बी न लावण्याचा निर्णय आज सर्व समाज घटकातील प्रमुख मंडळी व शांतता कमिटीच्या बैठकीत घेण्यात आला. तरीही कोणी डॉल्बी लावून कायद्याचे उल्लंघन केले, तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा यावेळी सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी दिला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी मंद्रुप पोलीस ठाण्यामध्ये शांतता कमिटीची बैठक झाली. यासाठी राजकीय पक्षासह व सर्व समाज घटकातील प्रमुख उपस्थित होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक म नोज पवार यांनी डॉल्बी मुक्त मिरवणूका काढण्याची सूचना दिली.

### ३८ गावात डॉल्बी मुक्त मिरवणुका

यावेळी बोलताना भाजपचे राज्य परिषदेचे सदस्य हनुमंत कुलकर्णी यांनी डॉल्बी मुक्त मिरवणुका ही काळाची गरज आहे. कारण डॉल्बी मुळे शांतता भंग होते. ध्वनि प्रदूषणाबरोबर आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्वच गावात डॉल्बी मुक्त मिरवणूका निघाल्या पाहिजेत.माजी उपसरपंच रमेश नवले व सचिन साठे यांनी शिवजयंती असो किंवा गणेशोत्सव यामध्ये आम्ही पारंपारिक वाद्य वापरतो. डॉल्बीला आमचा विरोध असल्याचे सांगितले.

यावेळी सचिन फडतरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या मिरवणुकीत यंदा आम्ही डॉल्बी लावणार नाही असा शब्द दिला. तर ग्रामपंचायत सदस्य यासीन मकानदार व अध्यक्ष दानेश शेख यांनी पैगंबर जयंतीच्या मिरवणुकीत डॉल्बी लावणार नसल्याचे सांगितले.बसवेश्वर मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष म्हाळप्पा घाले यांनी गणेशोत्सव व महात्मा बसवेश्वर जयंती मिरवणुकीत डॉल्बी न लावता पारंपारिक पद्धतीने मिरवणूक काढू असे सांगितले.

**कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई**

आपला सांस्कृतिक वारसा टिकवण्यासाठी सर्व मंडळांनी, मंडळाच्या प्रम ुखांनी मिरवणुकीत डीजे डॉल्बी वापरास प्रतिबंध करावा. डीजे कल्चर भावी पिढीसाठी धोकादायक ठरत आहे. चुकीच्या गोष्टी बंद झाल्याच पाहिजेत. डीजे लहान मुलांसह वयोवृद्धांसाठी त्रासदायक ठरत आहे, अनेकांना गंभीर आजारांना सामोरे जावे लागले आहे. डीजेपेक्षा सर्वच मंडळांनी पारंपारिक वाद्ये जी आपल्या महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा आहे, तो जपण्यासाठी, ती परंपरा पुढे नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. जर कोणी कायद्याचे उल्लंघन केले तर त्यांच्यावर कारवाई करणार.

**– सा.पो.नि. मनोज पवार (मंद्रूप)**

तर बंजारा समाजाचे नेते मोतीराम चव्हाण यांनी गणेशोत्सव व सेवालाल महाराजांची जयंती यामध्ये डॉल्बी न लावता आम्ही मिरवणूक काढू, असे सांगत सर्वांनी डॉल्बी न लावण्याचा घेतलेला निर्णय चांगला असल्याचे सांगितले.

माजी सरपंच पिराप्पा म्हेत्रे व गौरीशंकर मेंडगुदले यांनी डॉल्बीला विरोध करताना मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावांमध्ये डॉल्बीमुक्त मिरवणुका निघाल्या पाहिजेत. यासाठी पोलीस प्रशासनाने कायद्याचा वापर करावा असे सांगितले. तर आप्पासाहेब व्हनमाने व सुनील व्हनमाने यांनी अहिल्यादेवी होळकर जयंतीच्या मि रवणुकीत डॉल्बी न लावण्याचे आश्वासन दिले. शांतता कमिटीच्या या बैठकीस माजी सभापती अप्पाराव कोरे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष रेवणसिध्द मेंडगुदले, सुरेश पाटील, बाळासाहेब देशमुख, जेष्ठ पत्रकार अमोगसिध्द लांडगे, अम ोगसिध्द मुंजे, आरिफ नदाफ, बबलू शेख व अन्य उपस्थित होते.

# ऑनलाईन गेमिंगचे नियमन आणि प्रोत्साहन विधेयक - २०२५ लोकसभेत सादर

## खा. प्रतिभा धानोरकर यांच्या प्रयत्नांना मोठे यश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचे आणि वेगाने वाढणारे क्षेत्र असलेल्या ऑनलाईन गेमिंगमुळे निर्माण झालेल्या गंभीर समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी कर्तव्यदक्ष खासदार प्रतिभा धानोरकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. संबंधित आमदार असताना देखील विधानसभेत याबाबतचा आवाज उठविला होता.

सत्यासोबतच विद्यमान मंत्र्यांना याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यासोबत कठोर कारवाई करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र व्यवहार केला होता. त्यांच्या या कठोर परिश्रमामुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मोठे यश मिळाले आहे.

या गंभीर समस्येची दखल घेत, लोकसभेत माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स मंत्रालयाचे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ऑनलाईन गेमिंगचे नियमन आणि प्रोत्साहन विधेयक - २०२५ सादर केले आहे. हे विधेयक अनेक महत्वपूर्ण उद्दिष्टांसह आणले गेले आहे. ऑनलाईन मनी गेम्समुळे अनेक लोक कर्जबाजारी झाले असून, काही ठिकाणी व्यसनाधिनतेमुळे आत्महत्या करण्यासारख्या गंभीर घटना घडल्या



आहेत. हे विधेयक अशा ऑनलाईन मनी गेम्सवर पूर्णपणे बंदी घालण्याची तरतूद करण्यात आली आहे. जे वापरकर्त्यांकडून आर्थिक लाभाच्या अपेक्षेने खेळले जातात. याचा मुख्य उद्देश, विशेषत: तरुण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ व्यक्तींना व्यसनाधिनतेपासून आणि सामाजिक, आर्थिक व मानसिक हानीपासून संरक्षण देण्यात आले आहे. तसेच, या विधेयकात ऑनलाईन मनी गेम्सशी संबंधित आर्थिक फसवणू, मनी लॉण्ड्रिंग आणि करचोरी यासारख्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्यात येणार आहे.

या विधेयकात ई- स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक खेळांना प्रोत्साहन देण्याची तरतूद आहे. यासाठी एक स्वतंत्र ' ऑनलाईन गेमिंग प्राधिकरण' स्थापन केले जाईल, जे या खेळांना मान्यता देईल आणि त्यांचे नियमन करण्यात येणार आहे. ऑनलाईन मनी गेमिंग सेवांचा वापर दहशतवादाला निधी पुरविण्यासाठी केला जात असल्याच्या अहवालांच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक राष्ट्रीय सुरक्षेसाठी एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

# मांडवे खुर्द येथील शाळेला आनंद भंडारी यांची भेट

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याच्या उत्तरेच्या सगळ्यात शेवटच्या टोकाला असलेली मांडवे खुर्द येथील शाळा शैक्षणिक व भौतिक विकासात अग्रेसर अशी आदर्शवत शाळा आहे. वाह! जिल्हा परिषदेची शाळा असावी तर अशी, असे गौरव उद्गार अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी काढले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी नुकतीच मांडवे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेला भेट घेऊन शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि शाळेतील विकासाची पहाणी केली.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा प्रमाणे माझी आदर्श शाळा ह्या स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. गावात गेल्या पाच वर्षांत शाळेचा भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गावातील माजी सरपंच सोमनाथ आहेर व सरपंच कमल गागरे आणि त्यांच्या सर्व ग्रामपंचायत सहकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य लाभले आहे.

मुख्यमंत्री सुंदर शाळा घेतलेल्या अभियानात मांडवे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेने सुंदर शाळा पुरस्कार मिळाला म्हणून त्यांनी शाळेला भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. अशा शाळा व विद्यार्थी केवळ शिक्षक व ग्रामस्थांमुळे घडतात. सर्वांनी घेतलेल्या कष्टाचे तोंडभरून कौतुक केले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक, भास्कर पाटील, प्रसिध्द लेखक अनंत अवधानी, पारनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दयानंद पवार, सरपंच कमल गागरे, उपसरपंच मनिषा जाधव, गौतम बागुल, श्रीरंग गागरे, यशवंत जाधव मंगेश गागरे, सतिश जाधव, बाळासाहेब गागरे, सुविधा जाधव, सोपान आहेर यांच्यासह तालुक्यातील अनेक प्रशासकीय अधिकारी तसेच मुख्याध्यापक बाबाजी ढोकळे, शिक्षक संदिप झावरे, दत्तात्रय रोकडे, मंगल झावरे, लता शिरसाठ, प्रितम बर्वे, संदिप गाडे उपस्थित होते.



### शाळेची प्रगतीकडे वाटचाल

शाळा ही डिजिटल (इंटरएक्टिव बोर्ड), सीसीटीव्ही कॅमेरे, शाळा परिसरात पेव्हर ब्लॉक, शाळेला मशाल सामाजिक संस्थेमार्फत विद्युत सोलर सिस्टीम, स्वच्छता गृह, प्रशस्त क्रीडांगण, सुसज्ज कार्यालय, भोजनालय शेड, परसबाग, शाळा परिसरातील वृक्षारोपण, घनकचरा व्यवस्थापन व कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प ह्या सर्व सुविधांमुळे शाळेने नवे आधुनिक रूप धारण केले आहे. शाळा ही सर्व स्पर्धेत भाग घेऊन तालुका व जिल्हा स्तरीय स्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवून आपले नावलौकिक करत आहे. भंडारी यांनी गावातील चालू असलेल्या विकास कामांचा आढावा घेऊन गावात चालू असलेल्या घरकुल लाभार्थ्यांच्या कामांची पाहणी केली.

# नवी मुंबई पोलीसांकडून विघ्नहर्ता पुरस्कार २०२४ चा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, पनवेल :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरीता विघ्नहर्ता पुरस्कार या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी देखिल परिमंडळ ३, पनवेल चे वतीने विघ्नहर्ता पुरस्कार २०२४ चे आयोजन नुकतेच वासुदेव बळवंत फडके नाटयगृह, पनवेल या ठिकाणी करण्यात आले होते.

**पुरस्काराची रूपरेषा :-** विघ्नहर्ता पुरस्कारामध्ये पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांच्या आदेशान्वये, सहा पोलीस आयुक्त, पनवेल यांच्या अध्यक्षतेखाली परिक्षक मंडळाची स्थापना केली जाते, त्यामध्ये समाजातील विविध क्षेत्रातील पाच सदस्यांचा समावेश असतो. या समितीकडुन परिमंडळातील सर्व पोलीस ठाणे हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेटी दिल्या जातात.

तसेच त्यामध्ये १) उत्कृष्ठ गणेशमुर्ती २) उत्कृष्ट कार्यक्रम व सामाजिक उपक्रम ३) शिस्तबद्ध गणेश विसर्जन मिरवणुक ४) उत्कृष्ट देखावा ५) सर्वोत्कृष्ट गणेश मंडळ या पाच शिर्षकाखाली परिक्षक समिती ही सार्वजनिक गणेश मंडळांचे परिक्षण करते व विजेत्या गणेश मंडळांचे वरील शिर्षकाखाली प्रथम व द्वितीय अशी निवड करण्यात येते. पुरस्कारप्राप्त गणेश मंडळांना पुढील गणेशोत्सवाचे पुर्वी परिमंडळ स्तरावर विघ्नहर्ता पुरस्काराचे आयोजन करून पारितोषिक वितरण करण्यात येते.सन २०२४ गणेशोत्सवाकरीताचा विघ्नहर्ता पुरस्कार पारितोषिक वितरण समारंभ वासुदेव बळवंत फडके नाटयगृह, पनवेल येथे प्रशांत मोहिते, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ३, पनवेल, नवी मुंबई यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.नमूद विघ्नहर्ता पुरस्कार वितरण समारंभ करिता प्रमुख पाहुणे म्हणून कैलास गावडे, अतिरिक्त आयुक्त, पनवेल महानगरपालिका हे उपस्थित होते.

याव्यतिरिक्त उपस्थित मान्यवरांमध्ये १) जितेंद्र माने, कार्यकारी अभियंता महावितरण पनवेल २) भाऊसाहेब ढोले, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग ३) विक्रम कदम, सहा. पोलीस आयुक्त, खारघर विभाग ४) वैभव विधाते, उपायुक्त पनवेल महानगरपालिका ५) धनंजय सातपुते, अति. कार्यकारी अभियंता, महावितरण ६) मिलिंद कदम, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल हे उपस्थित होते. वरील नमूद कार्यक्रम अध्यक्ष व प्रमुख अतिथी यांच्या हस्ते परीमंडळ ३ मधील खालील गणपती मंडळांना विघ्नहर्ता पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

**१) उत्कृष्ट गणेश मूर्ती.**

प्रथम क्रमांक - श्री गणेश उत्सव मंडळ स्वामी विवेकानंद, उरण

द्वितीय क्रमांक - श्री गणेश मित्र मंडळ सेक्टर २४, कामोठे

**२) उत्कृष्ट कार्यक्रम व सामाजिक उपक्रम.**

प्रथम क्रमांक - शंभू मित्र मंडळ सेक्टर ३५, कामोठे

द्वितीय क्रमांक - गणेश मित्र मंडळ सेक्टर १८, खारघर

**३) शिस्तबद्ध गणेश विसर्जन मिरवणूक.**

प्रथम क्रमांक - जय दुर्गा क्रीडा व ग्रामविकास तरुण मंडळ रोहिंजन, तळोजा

द्वितीय क्रमांक - अभिनव युवक मित्र मंडळ पायोनियर, पनवेल

**४) उत्कृष्ट देखावा.**

प्रथम क्रमांक - राजे शिवाजीनगर रहिवासी सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, कळंबोली

द्वितीय क्रमांक - एकविरा मित्र मंडळ तक्का, पनवेल

**५) सर्वोत्कृष्ट गणेश मंडळ.**

प्रथम क्रमांक - जय हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, रीडघर


द्वितीय क्रमांक - अनमोल जीवन वेल्फेअर असोसिएशन, उलवे

तसेच परीक्षक मंडळ व पनवेल कोळीवाडा येथील गणपती विसर्जनास मदत करणारे स्वयंसेवक यांचा देखील सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात तक्का, पनवेल येथील पारंपारिक बॅन्ड पथकाचे तालावर गणेश मंडळानी आपले पुरस्कार उत्साहात व जल्लोषात स्विकारून आनंद व्यक्त केला. नमूद कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी सार्वजनिक गणेश मंडळाच्या सदस्यांना पर्यावरण पुरक, सामाजिक उपक्रमाचा, शिस्तबद्ध तसेच सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून गणेशोत्सव साजरा करावा अशा सुचना देऊन मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी यांनी त्यांना उद्भणाऱ्या समस्यांबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यावर उपस्थित त्या - त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रश्नांचे निरसन केले. अशा प्रकार विघ्नहर्ता पुरस्कार २०२४ कार्यक्रम जल्लोषात पार पडला.

# मुदखेड येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२१, मुदखेड (नांदेड) :** भारतीय संस्कृतीनं लादलेल्या परंतु आळी पाळीनं हजेरी लावणारे सण पोळा, गणेशोत्सव, दुर्गा देवी असे व इतरही सार्वजनिक सण उत्सव उंबरठ्यावर असतांना ते यशस्वीतेकडे नेण्यासाठी शहरात शांततेचा भाग म्हणून नुकतीच तहसील कार्यालयाच्या सभागृहात शांतता बैठक पार पडली.त्यात साजऱ्या होणाऱ्या उत्सवांना काही गालबोट लागू नये. यासाठी सुरक्षेच्या दृष्टीनं तहसील व पोलीस प्रशासनासह नागरिकांत सकारात्मक चर्चा झाली. सर्वांच्या सहकार्याने शहरात निश्चितच शांतता एकवटणार असल्याचे अनेकांचे मत आहे.पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली तहसील, नगरपालिका, वीज वितरण अशा बहुतांश विभागातील



प्रशासकीय अधिकाऱ्यांसह, प्रतिष्ठित नागरिक, राजकारणी, तालुक्यांतील पोलीस पाटील व पत्रकार यांच्या उपस्थितीत दि.२१ ऑगस्ट रोजी शांतता बैठक पार पडली. यात अगदी जवळ असलेल्या पोळा, गणेशोत्सव, दुर्गादेवी अशा सण उत्सव यशस्वी पार पाडण्यावर खुली चर्चा झाली. तहसीलच्या सभागृहात पार पडलेल्या बैठकीच्या सुरुवातीलाच पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांनी सण उत्सवा विषयीच्या शासनाच्या गाईडलाईन त्यांनी नागरिकांना पुढे ठेवल्या.

# थोडक्यात

## कलासाधना सामाजिक संस्था आयोजित राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**




**दि.२०, नवी मुंबई :** कलासाधना सामाजिक संस्था, नवीमुंबई यांच्या वतीने प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षी स्वतंत्रता दिवस निमित्त १५ ऑगस्ट राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कला शिक्षकांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ह्या स्पर्धेसाठी स्वतंत्रता दिवस हा विषय देण्यात आला होता. महाराष्ट्र राज्यातून या स्पर्धेला खूप चांगला प्रतिसाद लाभला होता. सर्व विजय स्पर्धकांना दिनांक ०७ सप्टेंबर २०२५ रोजी कामोठे, नवी मुंबई येथे कार्यक्रमांमध्ये सन्मानचिन्ह/ सन्मानपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून राधिका कुसुरकर वाघ चित्रकार व प्राध्यापक /सर जे.जे. स्कूल ऑफ डिझाईन डॉ. गजानन शेपाळ, चित्रकार व प्राध्यापक /सर जे.जे स्कूल ऑफ आर्ट मनोहर एस.बाविस्कर, कलाशिक्षक / चित्रकार फळा तेथे शाळा/ सुयश चित्रकला पुस्तकाचे लेखक यांनी केले. असेच संस्थेच्या अध्यक्षा मेघा महाजन यांनी यावेळी बोलताना सांगितले. तसेच पुढील विजयी स्पर्धकांचा निकाल त्यांनी जाहीर केला.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -**

प्रथम पारितोषिक - नरेंद्र हिरामण भुसारे, द्वितीय पारितोषिक - सुनिल प्रकाश भोसले, तृतीय पारितोषिक - घनश्याम प्रकाश बोरसे /चित्रसेन वासुदेव पागधरे, उत्तेजनार्थ पारितोषिक - दिनेश शंकर रिकामे, दाभाडे सुनिल आनंदा, विठ्ठल दत्तात्रय काकडे, सिराज हैदर तडवी, अर्जुन सरस्वती धाकु माचिवले, अमरसिंग टेंबऱ्या वसावे, बाबुलाल मंगतू जाधव, दत्ताराम रामचंद्र कोकरे, मेघा प्राणजीत बोरसे, मुरलीधर के. कुंभार, नरेंद्र दादाजी साबळे, शंकर रामचंद्र सोनावणे, विजय काशिनाथ सूर्यवंशी, दिनेश नामदेव सूर्यवंशी सर्व विजय स्पर्धकांना आयोजकांकडून खूप सार्या शुभेच्छा.

## पुण्यातील संस्था, वृद्धाश्रम व दिव्यांगाच्या मदतीला २ महिन्यांच्या रॅशनची केली व्यवस्था

**अक्षराज : दिवाकर घेर**




**दि.२१, नागपूर :** समाजात आजही माणुसकी जिवंत असल्याचे पुण्यातील एका सामाजिक संस्थेने दाखवून दिले असून खापरखेडा परिसरातील वृद्धाश्रम व दिव्यांग शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी २ महिन्यांच्या रेशनची व्यवस्था करून दिल्यामुळे पुण्यातील संस्थेने समाजासाठी आदर्श निर्माण केला आहे. पुण्यातील प्रतिष्ठित व्यापारी राजेश नाहर हे अखिल भारतीय नाहर समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहे. या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. खापरखेडा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते अमर जैन यांचे राजेश नाहर यांच्याशी जवळचे संबंध आहेत. अमर जैन यांची पुण्यात भेट झाली असतांना राजेश नाहर यांच्याशी भेट झाली. यावेळी अमर जैन यांनी स्व.फुलचंद जैन मतिमंद शाळा व संजीविनी वृद्धाश्रमा बाबत माहिती सांगितली. मतिमंद शाळा व संजीविनी वृद्धाश्रम यांना शासन कोणत्याही प्रकारचे अनुदान देत नाही त्यामूळे त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न नेहमी संस्था चालकांना होत असतो त्यामूळे नाहर व समाज सामाजिक संस्थेच्या वतीने मदत देण्याचे आवाहन केले. यावेळी नाहर समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश नाहर यांनी क्षणाचा विलंब न करता दोन महिने पुरेल इतक्या रेशनची व्यवस्था करून दिली, शिवाय भविष्यात आणखी काही मदत लागल्यास नाहर समाज नेहमी पुढे राहील असे आश्वासन राहेश नाहर यांनी दिले. याप्रसंगी स्व.फुलचंद जैन व संजीविनी वृद्धाश्रम संस्था चालकांनी राजेश नाहर यांचे आभार मानले आहे.

## पंढरपूर शहरात रिक्षामध्ये अवैध गॅस भरताना दोघांना अटक

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.२१, पंढरपूर :** पंढरपूर शहर अवैधरीत्या रिक्षामध्ये गॅस भरुन तो विक्री करीत असताना शहर पोलीसांनी कारवाई करत दोघांना अटक केली आहे. तर गॅस टाकी, गॅस भरण्याचा कॉम्प्रेसर, वजनकाटा, एक रिक्षा असा ७६ हजार ६८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी अवैध गॅस भरणारी करणारी टोळी पकडण्यांसाठी पंढरपूर शहरातील गाडगे महाराज चौक ते विस्थापीत नगर कडे जाणा-या रोड लगत असलेल्या पत्राशेडमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पंढरपूर येथील पोलीस पथक पाठवून सदर पथकाचेव्दारे छापा कारवाई केली. या ठिकाणी यातील आरोपी गणेश पोपट लिंगे रा. माळी वस्ती, टाकळी रोड, पंढरपूर व निलेश कृष्णा राजुरकर रा.हनुमान नगर, टाकळी रोड, पंढरपूर हे अवैधरीत्या गॅस रिक्षामध्ये भरताना मिळून आले. त्यांच्या ताब्यातून घरगुती वापरासाठी लागणाऱ्या गॅस टाकी, गॅस भरण्याचा कॉम्प्रेसर, वजनकाटा, एक रिक्षा असा ७६ हजार ६८० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात जिवनावश्यक वस्तु कायदा कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ही कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, सहा. पोलीस अधिक्षक पंढरपूर उपविभाग प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पिसाळ, पोलीस उपनिरीक्षक घुगरकर, पोह निलेश रोंगे, पोना विनोद शिंदे, पोकॉ राहुल लोंढे, पोकॉ शिवशंकर हुलजंती यांनी केलेली आहे.

## पालम नगरपंचायत च्या उपाध्यक्षपदी शिरसकर यांची बिनविरोध निवड

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२१, पालम (परभणी) :** गुरुवार, दिनांक २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता पालम नगरपंचायत च्या उपाध्यक्ष पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी नगरपंचायत चे १४ नगरसेवक व एक स्वीकृत नगरसेवक उपस्थित होते तर तीन नगरसेवक व एक स्वीकृत नगरसेवक अनुपस्थित होते. उपाध्यक्ष पदासाठी भास्कर गंगाराम सिरस्कर यांचा एकच अर्ज आला होता त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. यावेळी नगरपंचायत चे मुख्याधिकारी डॉ.उत्कर्ष गुट्टे व नगरपंचायत चे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.